ePaper

# गेल्या दीड वर्षामध्ये 3 लाख तरूणांना रोजगार दिला: मुख्यमंत्री



| वर्ष - 7 | अंक - 131 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 13 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- मला वाटलं 'सचिन तेंडुलकर' मेला!
- आलिया भट्ट रोज बिग बॉस पाहायची
- आता मथुरेचा कायापालट होणार!
- सरकारला 1 महिन्याची मुदत!



# शिवरायांचा सर्वात उंच पुतळा जुन्नरमध्ये!

## » माजी आमदार शरद सोनवणे यांची माहिती : 'त्या' घोषणेचा सस्पेन्स अद्याप कायम

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या जुन्नर तालुक्यातील शिवजन्मभूमीत छत्रपती शिवाजी महाराजांचा जगातील सर्वांत उंच पुतळा बसविण्यात येणार असून, एका वर्षात हा पुतळा उभारण्यात येईल, अशी घोषणा माजी आमदार तथा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख (शिंदे गट) शरद सोनवणे यांनी केली.**

चाळकवाडी येथील राजगड या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माजी आ. शरद सोनवणे बोलत होते. यावेळी प्रदीप देवकर, प्रदीप चाळक, दर्शन फुलपगार, अविनाश करडिले, अक्षय कुटे आदी उपस्थित होते.

सोनवणे म्हणाले की, संपूर्ण जगातील सर्वांत उंच पुतळा गुजरात राज्यातील राजपिंपळा शहराच्या जवळ असलेल्या नर्मदा धरणाजवळ सरदार वल्लभभाई पटेल यांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा आहे. त्याच धर्तीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जुन्नर तालुक्यात शिवनेरी किल्ल्याजवळ खासगी जागेत वर्षभरात उभारण्यात येणार आहे. हातात तलवार असलेला शिवरायांचा हा पुतळा ब्रॉन्झ



धातूमध्ये मुंबई येथे तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर लोकार्पण करून मेंटेनन्ससाठी सरकारच्या ताब्यात दिला जाईल. जगाला या पुतळ्याची नोंद घ्यावी लागेल, असा हा पुतळा असेल.

लोकवर्गणी अथवा खासगी लोकांच्या मदतीने की ठरावीक लोकांच्या मदतीने हा पुतळा उभारावा यासाठी लवकरच एक समिती तयार करण्यात येणार आहे.

### पुतळ्याच्या नावासाठी जनतेमधून 'टॅगलाईन'

» सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' असे नाव देण्यात आले आहे, छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला काय नाव द्यावे? यासाठी जनतेमधून टॅग लाइन मागविण्यात येणार आहे. २९ तारखेला चार मोठ्या घोषणा होणार आहेत. त्यातील शिवरायांच्या पुतळ्याची घोषणा आज जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित तीन घोषणा व छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा खर्च, जागा यांची माहिती येत्या २९ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येईल, असे सांगून तीन घोषणांबाबत सोनवणे यांनी सस्पेन्स कायम ठेवला आहे.

# चारशेजणांना गंडा; बंटी-बबली गजाआड!

## » गुन्हे शाखेची कारवाई : बनावट स्क्रीन शॉटद्वारे आरोपींचा प्रताप

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

खरेदी केल्यानंतर यूपीआयद्वारे पेमेंट केल्याचा बनावट स्क्रीन शॉट दाखवून चारशे जणांना गंडा घालणाऱ्या बंटी-बबलीला पोलिसांनी सापळा रचून अटक केली. गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने ही कामगिरी केली.

गणेश शंकर बोरसे (३४), प्रिया गणेश बोरसे (२८. दोघे रा. काकडे यांची रुम, पठारे वस्ती, लोहगाव, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

वरिष्ठ निरीक्षक शंकर अवताडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिलीपकुमार माली (रा. रहाटणी) यांनी तक्रार दिली होती की, एका दांपत्याने त्यांच्या



कपड्याच्या दुकानात खरेदी केली. त्यानंतर ऑनलाईन पेमेंट करतो, असे सांगून खोटा स्क्रीन शॉट दाखवत त्यांची फसवणूक केली.

### अशी करायचे फसवणूक..

» आरोपी दुकानदाराशी गोड बोलून त्यांचा विश्वास संपादन करीत होते. त्यानंतर जीवनावश्यक, मौजमजेच्या वस्तूंची खरेदी करायचे. खरेदीनंतर ऑनलाईन पेमेंट केल्याचे सांगून एकरा बँकेच्या बनावट अॅपचे स्क्रिन शॉट दुकानदाराला दाखवले जायचे. पेमेंट आले नसल्याने दुकानदाराने आरोपींना थांबवल्यास २४ तासांच्या आत पेमेंट येते, पेमेंट न आल्यास मला फोन करा, असे सांगून आरोपी स्वतःचा मोबाईल क्रमांक दुकानदारांना द्यायचे.

# रुग्णालयात वृद्धांसाठी स्वतंत्र युनिट असावे!

## आंतरराष्ट्रीय पातळीवरील मार्गदर्शक उपक्रम व्हावा : राज्यपाल

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**वृद्ध नागरिकांचे जीवन अधिक सुखद व्हावे आणि सामाजिक व आर्थिक आव्हानांना सहजपणे तोंड देता यावे यासाठी 'वृद्ध मित्र' सारख्या दूरदृष्टीने राबविलेल्या अभिनव उपक्रमांची आवश्यकता आहे. सर्वांनी मिळून या उपक्रमाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मार्गदर्शक उपक्रम करण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.**

सोसाइटी ऑफ कम्युनिटी हेल्थ ओरिएंटेड ऑपरेशनल लिंक्स (स्कूल) द्वारा आयोजित 'वृद्ध मित्र' कार्यक्रमाच्या शहर स्तरावरील विस्तार कार्यक्रमाच्या उद्घाघटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, 'स्कूल'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बेनझीर पाटील आदी उपस्थित होते. राज्यपाल बैस म्हणाले, ज्येष्ठ नागरिक हे वयासोबत येणारे अनुभव आणि ज्ञानाचे भांडार आहेत. समाजावर त्यांचे असलेले ऋण लक्षात घेता ते आदर आणि सन्मानास पात्र आहेत. देशात २०५० पर्यंत वृद्धांची संख्या ३१ कोटीपेक्षा अधिक होण्याचा अंदाज आहे.




### स्वतंत्र रुग्णवाहिका ही आजची गरज

» समाजातील वृद्ध व्यक्तींना जीवनाच्या या टप्प्यावर भावनात्मक, सामाजिक आणि मानसिक आधाराची आवश्यकता असते. त्यादृष्टीने 'वृद्ध मित्र' हा 'स्कूल' संस्थेचा अभिनव उपक्रम आहे. वृद्धांच्या घरी जावून आवश्यक सेवा देणे ही सर्वोच्च सेवा आहे. प्रत्येक रुग्णालयात वृद्धांसाठी स्वतंत्र युनिट असणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका ही आजची गरज आहे. यासोबतच घरातील वृद्ध हे ओझे नाही तर आशीर्वाद आहे हे तरुणांनी समजून घेण्याचीही गरज आहे.

वृद्ध साधारणत: अर्थार्जनाचे काम करत नसल्याने त्यांना गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्याकडे ओझे म्हणून पाहणे किंवा त्यांची कुटुंबात होणारी उपेक्षा ही वेदनादायी असते. पारंपरिक कुटुंब पद्धतीतील बदलामुळे येणारी सामाजिक सुरक्षेची कमतरता आणि एकटेपणाच्या भावनेने ही समस्या अधिक वाढते. पेन्शन घेणाऱ्यांची संख्या कमी असल्याने पौष्टिक आहार, आरोग्यसेवा, औषधे घेण्याची समस्या त्यांच्यासमोर असते. अशावेळी त्यांना समाजाकडून प्रेमाची आणि सहकार्याची आवश्यकता असते. हे कार्य 'वृद्ध मित्र' सारख्या संस्था करीत आहेत. अशा प्रकारच्या प्रयत्नांची गरज प्रत्येक स्तरावर आहे, असे राज्यपाल म्हणाले. समाजातील वृद्ध व्यक्तींना जीवनाच्या या टप्प्यावर भावनात्मक, सामाजिक आणि मानसिक आधाराची आवश्यकता असते.

त्यादृष्टीने 'वृद्ध मित्र' हा 'स्कूल' संस्थेचा अभिनव उपक्रम आहे. वृद्धांच्या घरी जावून आवश्यक सेवा देणे ही सर्वोच्च सेवा आहे. प्रत्येक रुग्णालयात वृद्धांसाठी स्वतंत्र युनिट असणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका ही आजची गरज आहे. यासोबतच घरातील वृद्ध हे ओझे नाही तर आशीर्वाद आहे हे तरुणांनी समजून घेण्याचीही गरज आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये वृद्ध व्यक्तींची देखभाल करण्यासाठी सदस्यांनी पुढाकार घ्यायला हवा. स्कूलसारख्या संस्थांनी शासनाकडे वृद्ध व्यक्तींसाठी धोरण जाहीर करण्यासाठी आग्रह धरावा. पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने सुरू करण्यात येत असलेला 'वृद्ध मित्र' हा अभिनव उपक्रम सर्व ठिकाणी राबविला जावा, अशी अपेक्षा राज्यपाल यांनी व्यक्त केली. विक्रम कुमार म्हणाले, शहरातील झोपडपट्टी भागात राहणाऱ्या वृद्ध व्यक्तींना मदत करण्यासाठी आणि पुणे शहराला वृद्ध व्यक्तींसाठी अनुकूल शहर बनविण्याचा 'स्कूल' संस्थेचा प्रयत्न आहे.

# पुणे पोलिसाचा कुंटणखान्यावर छापा

## बांगलादेशी महिलांसह 7 जणांना पकडले

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे शहरातील बुधवार पेठेत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी महिलांसह सात जणांना गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने पकडले. पोलिसांच्या पथकाने एका कुंटणखान्यावर छापा टाकून अल्पवयीन बांगलादेशी मुलीला ताब्यात घेतले. आठवडाभरापूर्वी पोलिसांनी बुधवार पेठेतील वेश्यावस्तीतून बांगलादेशी महिलांसह 19 जणांना पकडले होते.**

बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत बांगलादेशी महिला, त्यांचे साथीदार बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली होती. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून पाच बांगलादेशी महिलांसह सात जणांना ताब्यात घेतले. चौकशीत एका कुंटणखान्यात बांगलादेशी अल्पवयीन मुलीकडून वेश्याव्यवसाय करुन घेतला जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने अल्पवयीन मुलीची कुंटणखान्यनातून सुटका केली. बांगलादेशी महिला आणि नागरिकांकडे चौकशी करण्यात आली. तेव्हा त्यांच्याकडे वास्तव्याची कोणतीही कागदपत्रे नसल्याचे उघडकीस आले.



### अल्पवयीन मुलीची सुटका

» बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत बांगलादेशी महिला, त्यांचे साथीदार बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली होती. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून पाच बांगलादेशी महिलांसह सात जणांना ताब्यात घेतले. चौकशीत एका कुंटणखान्यात बांगलादेशी अल्पवयीन मुलीकडून वेश्याव्यवसाय करुन घेतला जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने अल्पवयीन मुलीची कुंटणखान्यनातून सुटका केली. बांगलादेशी महिला आणि नागरिकांकडे चौकशी करण्यात आली. तेव्हा त्यांच्याकडे वास्तव्याची कोणतीही कागदपत्रे नसल्याचे उघडकीस आले.

ताब्यात घेण्यात आलेल्या 5 बांगलादेशी महिला या वेश्या व्यवसाय करत होत्या. तर त्यांच्या सोबत असणारे पुरुष हे वेगवेगळे व्यवसाय करत होते. बेकायदा वास्तव्य केल्याप्रकरणी सात बांगलादेशी नागरिकांविरुद्ध पोलिसांनी पारपत्र अधिनियम, तसेच परकीय नागरिक आदेश कायद्यातील कलमांन्वये फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी तीन दलालांविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त रितेश कुमार, सहआयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक भरत जाधव, सहायक निरीक्षक अश्विनी पाटील, अनिकेत पोटे, राजेश माळगावे, राजेंद्र कुमावत, बाबासाहेब कर्पे, अजय राणे, तुषार भिवरकर, मनीषा पुकाळे, अमेय रसाळ, सागर केकाण आदींनी ही कारवाई केली.

# भंगार व्यावसायिकाचे मुलाचे अपहरण!

। पुणे । महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

शहरातील हिंजवड पोलिस ठाण्याचे हद्दीत ताथवडे येथील एका भंगार व्यवसायिकाच्या 14 वर्षीय मुलाचे झेन गाडी मधून आलेल्या तीनजणांनी अपहरण केले. त्यानंतर मुलाची सुटका करण्यासाठी अपहरणकर्त्यांनी व्यवसायिकाकडे 30 लाख रुपये खंडणीची मागणी केली. याबाबतची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सदर गंभीर प्रकरणाचा तातडीने तपास करत गुन्हे शाखा युनिट चारचे पथकाने सासवड येथून अपहरण झालेल्या मुलाची सुखरुप सुटका करत तीन आरोपींना अटक केली आहे.तेजस ज्ञानोबा लोखंडे (वय-21,रा.मारुंजी,पुणे), अर्जुन सुरेश राठोड (19,रा. मारुंजी,पुणे) व विकास संजय मस्के (22,रा. भूमकर चौक,पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. त्यांच्या ताब्यातून पोलिसांनी तीन मोबाईल फोन, एक छऱ्याचे पिस्टल, अडीच फुट लांबीचा कोयता , एक सुरा, छत्री, हातोडा असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर व्यावसायिकाच्या 14 वर्षीय मुलाचे अपहरण झाल्याची माहिती पोलिस हवालदार मोहम्मद गौस नदाफ यांना मिळाली होती. प्रकार गंभीर स्वरुपाचा असल्याने पोलिस आयुक्त यांनी याबाबत गुन्हे शाखा युनिट चारचे पथकाचे वपोनि शंकर आवताडे, दरोडा विरोधी पथकाचे वपोनि दिपक शिंदे यांना तातडीने तपास करण्याचे आदेश दिले होते. पोलिसांनी मुलाचे अपहरण केलेल्या ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, तीन जणांनी मुलाचे निळ्या रंगाचे झेन कार मधून अपहरण केल्याचे दिसून आले. पोलिसांनी अपहरण केलेल्या मुलाचे काका यास ताब्यात घेऊन त्याचेकडे चौकशी करुन त्याचेकडून माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यादरम्यान अपहरण झालेल्या मुलाचे काकास वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरुन एका व्यक्तीने फोन करुन,'30 लाख रुपयांची खंडी दे नाहीतर, तुमच्या मुलाचे हात पाय तोडून त्यास मारुन टाकतो' अशाप्रकारचे खंडणीचे फोन केले.

# क्रांतिवीर चापेकर स्मारक प्रेरणास्थळ!

## राज्यपाल रमेश बैस : सुवर्ण महोत्सवाचा सांगता समारंभ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**क्रांतिवीर चापेकर बंधुंचे स्मारक हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचे असून देशासाठी भूषणास्पद आहे. क्रांतीवीर चापेकर स्मारक समिती आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने पुनर्निमाण करुन स्मारक देशासाठी प्रेरणास्थळ बनविले आहे. स्मारकामुळे नव्या पिढीला चापेकरांचे कार्य, इतिहास माहिती होईल, असे मत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केले. चापेकर स्मारक समिती संचलित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् चे भटक्या-विमुक्तांच्या सशक्तीकरणासाठीचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरद्गारही त्यांनी काढले.**



क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीच्या सुवर्ण महोत्सवाचा सांगता समारंभ राज्यपाल बैस यांच्या उपस्थित मंगळवारी पार पडला. समितीचे अध्यक्ष, पद्मश्री गिरीश प्रभुणे, विश्वस्त मिलींद देशपांडे, कार्यवाह ॲड सतिश गोरडे, आमदार महेश लांडगे, उमा खापरे, अश्विनी जगताप, महापालिका आयुक्त शेखर सिंह, सह धर्मादाय आयुक्त सुधीरकुमार बुक्के, भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, कोषाध्यक्ष रवी नामदे, निता मोहिते, शकुंतला बन्सल, अशोक पारखी, नितीन बारणे, सुहास पोफळे, आसाराम कसबे, राहुल बनगोंडे आदी उपस्थित होते. राज्यपाल बैस यांनी चापेकर वाड्याला भेट दिली. वाड्याची माहिती घेतली. त्यानंतर पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् ला भेट दिली. गुरुकुलममधील विद्यार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधला.

राज्यपाल बैस म्हणाले, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् मध्ये पारधी समाजीतल 350 विद्यार्थ्यांची देखभाल केली जात आहे. शिक्षण, महिला सशक्तीकरण, भटक्या-विमुक्त जातीच्या विकासासाठी समिती काम करत आहे. पारधी, वडार, कैकाडी, गोसावी, गोंधळी, डोंबरीसह विविध जातीच्या लोकांच्या सशक्तीकरणासाठी कार्य केले जात आहे. आदिवासी समाजाचे लोक इंग्रजांना आव्हान देणारे पहिले स्वातंत्र्य सेनानी आहेत. आदिवासी, भटक्या जाती जमातीतील लोकांना शिक्षित करण्यासाठी आवश्यक कौशल्य प्रधान करण्याची गरज आहे.

एकीकडे चांद्रयान मिशन यशस्वीपणे पूर्ण केले आहे. सौर मिशनही लॉंच केले आहे. दुसरीकडे कमकुवत समाजातील लोक अन्यायाने पिडीत आहेत. सन्मानासाठी झुंजत आहेत. प्रास्तविक करताना गिरीश प्रभुणे म्हणाले, पारधी समाजातील मुले शिक्षण घेत आहेत. मुलांना वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकासाचे कौशल्यावर आधारित शिक्षण दिले जाते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिंगबर ढोकले यांनी केले. तर, ॲड सतिश गोरडे यांनी आभार मानले.

### ... तरच युवक आत्मनिर्भर बनतील!

» पुनरुत्थान गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांना संगणक, मूर्ती कला, कौशल्यावर आधारित शिक्षण दिले जात आहे. कुशल मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी जगातील विविध देश भारताकडे आशेने बघत आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना रोजगारपूरक शिक्षण, सर्वोतम, भाषा कौशल्य दिले पाहिजे. युवकांना उद्योजक बनण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. तरच युवक आत्मनिर्भर बनतील. त्यांच्या कुटुबियांचा जीवनस्तर उंचावेल, असेही राज्यपाल बैस म्हणाले.

### राजभवनाचे दरवाजे खुले

» क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे कार्य वाखणण्याजोगे आहे. समितीसाठी राजभवनाचे दरवाजे सातत्याने खुले आहेत. समितीसाठी कोणतीही मदत करु शकल्यास मला सर्वाधिक आनंद होईल, असेही राज्यपाल बैस म्हणाले.

# महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिवमहापुराण कथा सोहळा

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची माहिती

### सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर मोफत अध्यात्मिक कार्यक्रम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मानवी जीवनात ज्ञान, मोक्ष, त्याग, उपवास, तप आणि जप याचे महत्त्व अधोरेखित करणारी तसेच शिव-शक्ती आणि शिव- महिमा याची प्रचिती देणारे शिव चरित्र पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील भाविक-भक्तांना श्रवण करता यावे. यासाठी श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा भक्ती सोहळ्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली**

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवारच्यावतीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचे आयोजन दि. १५ ते २१ सप्टेंबर २०२३ दरम्यान दुपारी २ ते ५ या वेळेत पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे केले आहे. परमपूज्य पंडित प्रदीप मिश्रा यांच्या सुश्राव्य वाणीतून हा अभूतपूर्व अध्यात्मिक सोहळा रंगणार आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव पुराण कथा मोफत वाचन सोहळा आहे. यावेळी माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, स्थायी समितीचे माजी सभापती राजेंद्र राजापूरे, विलास मडिगेरी, निर्माल्य सेवा ट्रस्टचे श्री.रामकृष्ण यादव आदी उपस्थित होते.

शंकर जगताप म्हणाले की, मध्यप्रदेश येथील प. पु. पंडित प्रदीप मिश्रा यांच्या अमोघ वाणीतून ही कथा ऐकण्याची संधी पिंपरी-चिंचवडवासीयांना मिळणार आहे. पंडित मिश्रा यांचे लाखो अनुयायी कथेचे श्रवण करण्यासाठी येणार आहेत. या दिवसांमध्ये सुमारे आठ ते नऊ लाख श्रोते या कथेचे श्रवण करतील. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. आलेल्या भाविकांसाठी प्रशस्त व्यवस्था केली आहे. पार्किंग, सुसज्ज बैठक व्यवस्था, स्वच्छतागृह, रुग्णवाहिका, प्रथमोपचार सुविधा, जेवन, नाष्टा, शुद्ध पिण्याचे पाणी, अग्निशमन यंत्रणा, स्वच्छता नियोजन, सुरक्षा, पोलीस बंदोबस्त, भाविकांची निवास व्यवस्था, आपतकालीन व्यवस्था अशी जय्यत तयारी केली आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून शिवभक्त या कथा वाचन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता भव्य मंडप व संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री शिव महापुराण कथा आयोजन समिती गठीत केली आहे.



### पंडित प्रदीप मिश्रा यांच्याबाबत माहिती...

प. पु. पंडित प्रदीप मिश्रा हे मध्यप्रदेश सिहोर येथील आहेत. त्यांचा जन्म १९८० मध्ये झाला असून, त्यांची आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा वाचक म्हणून अध्यात्मिक क्षेत्रात ओळख आहे. भगवान महादेवाची शिव महापुराण कथा लोकांपर्यंत पोहोचवावी आणि त्यातून लोकांना चांगल्या मार्गावर जगण्याची प्रेरणा मिळावी, या उद्दात्त हेतूने कार्य करीत आहेत. त्यांचे लाखो अनुयायी आहेत. 'आस्था' या अध्यात्मिक वाहिनीवर त्यांच्या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण होते.

### अध्यात्मिक अनुभवाची मोफत पर्वणी...

» भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता भव्य मंडप व संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री शिव महापुराण कथा आयोजन समिती गठीत केली आहे. या समितीच्या बरोबरीने नियोजनासाठी २५ समित्यांची स्थापना करण्यात आलीं आहे. या समित्यांकडे सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या आहेत. हा संपूर्ण अध्यात्मिक सोहळा नागरिकांसाठी मोफत आहे. कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व समाजातील धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडू अशा सर्वांना निमंत्रित करण्यात आले आहे.

### भाविकांसाठी भव्य मंडप...

» सभा मंडप येथे आगामी सात दिवसात भाविकांचा मोठा राबता असणार आहे. यासाठी सुसज्ज असा सभामंडप बांधण्यात आला असून यामध्ये सुमारे १ लाख भाविक एका वेळी बसून कथा ऐकू शकतील. तसेच आजूबाजूला देखील मिळून सुमारे ५० हजार म्हणजे एकून १.५ लाख लोक एकावेळी कथेचा आस्वाद घेवू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे ५ ते १० हजार भाविकांचे 'एक ब्रॅकेट्स' अशी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अँब्युलन्स थेट मंचापर्यंत जावू शकेल अशा प्रकारे मंडपाची बांधणी करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला येणारे सुमारे १५ ते २० हजार भाविक हे सभामंडपात मुक्कामी असतात. अशा भाविकांसाठी मैदानाच्या एकाबाजूला सुमारे ३०० शौचालयांची देखील व्यवस्था करण्यात आलीं आहे. याबरोबरीने पिण्याच्या तसेच वापरण्याच्या पाण्याची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.




**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या नावे दिल्या जाणाऱ्या राज्य 'आदर्श शिक्षक पुरस्कार' कार्यक्रमात शालेय शिक्षणमंत्र्यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या. महाराष्ट्रात एक 'नवं युग' आणण्याचा दावा करत "राज्यातील कंपन्यांच्या 'सीएसआर'चा (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) पैसा सरकारी शाळांकडे वळवून शाळांचा दर्जा राखण्याची जबाबदारी त्या कंपन्यांची" केली जाईल, असं सांगितलं.**

# अर्थसंकल्पीय तरतुदीऐवजी 'दात कोरून'?



यामुळे "कोणत्या कंपनीची शाळा चांगली आहे अशी स्पर्धा शाळाशाळांमध्ये लागेल" (व दर्जा सुधारेल). या बदल्यात, "जी कंपनी स्पॉन्सर करेल तिचं नाव पाच किंवा दहा वर्षांसाठी शाळेला" लावलं जाईल. जवळपास ६५,००० सरकारी शाळांमधील "इन्फ्रास्ट्रक्चर सुमार दर्जाचं असल्यामुळं जे ज्ञान माननीय पंतप्रधान आपल्याला देऊ इच्छितायत" ते देण्यात अडचणी येतायत, म्हणून ही योजना आणलीय. 'दत्तक देणे' या शब्दाचा वापर टाळून मांडलेली योजना म्हणजे 'शाळांचं दत्तकविधान' आहे. तिथं उपस्थित अर्थ तथा उपमुख्यमंत्र्यांनी "आपल्या राज्यात काही हजार कोटी रुपये सीएसआर निर्माण होतो, पण बहुतेक जण महाराष्ट्रात खर्च करत नाहीत," असं सांगून "यातला ५० टक्के पैसा जरी राज्यात खर्च झाला तर सगळ्या शाळांचं इन्फ्रास्ट्रक्चर वाढेल," असा आशावाद व्यक्त केला. शिक्षकदिनी सरकारी शिक्षकांचा सत्कार करतानाच सरकारी शाळांची गुणवत्ता खासगी कंपन्यांवर सोडून देण्याचं, एरवी धाडसी वाटणारं काम मंत्रीद्वयानं सहज केलं. ज्या 'सीएसआर'चा पुनरुच्चार व जयघोष करत सरकारने गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घटनादत्त व बंधनकारक कर्तव्यातून पलायनाची वाट आखून घेतलीय, त्याचा विचार थोडा बारकाईनं करणं औचित्याचं ठरेल. 'कंपनी कायदा २०१३'च्या कलम १३५ नुसार केवलमूल्य ५०० कोटींपेक्षा जास्त किंवा उलाढाल १००० कोटींपेक्षा जास्त किंवा वार्षिक नफा पाच कोटींपेक्षा जास्त असलेल्या प्रत्येक कंपनीने तिच्या तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या दोन टक्के इतकी रक्कम 'सीएसआर' स्वरूपात समाजोपयोगी कामासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. हा कायदा लागू झाल्यापासून म्हणजे २०१४-१५ ते २०२१-२२ या आठ वर्षांच्या कालावधीत देशपातळीवर खर्चित 'सीएसआर'च्या रु. १,५३,५५१ कोटींपैकी ७६,१७९ कोटी रु. म्हणजे जवळपास निम्मा खर्च शिक्षण आणि आरोग्यावर झालाय. या दीड लाख कोटींपैकी महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक म्हणजे २३,८८६ कोटी रु. आहे. या खालोखालच्या कर्नाटक, गुजरात, तमिळनाडू या राज्यांचा एकत्रित हिस्सा महाराष्ट्रापेक्षा थोडा कमी म्हणजे २३,५६१ कोटी रु. आहे. राज्याच्या स्थापनेपासून औद्योगिकीकरणात राज्याने घेतलेल्या आघाडीचं हे निदर्शक आहे. मात्र २०१४-१५ ते २०२१-२२ दरम्यानच्या राज्यवार 'सीएसआर'वाढीच्या दराचा आढावा घेतला तर महाराष्ट्र थेट १७ व्या क्रमांकावर दिसतो. शिवाय 'सीएसआर'मधली आंतरजिल्हा विषमता शब्दश: भीषण आहे. उदाहरणार्थ, शिक्षण (व अपंगत्व तथा उपजीविका) अंतर्गत २०१४-१५ ते २०२०-२१ पर्यंतच्या सात वर्षांत पुणे जिल्ह्याला सर्वाधिक म्हणजे रुपये १,०२६ कोटी मिळाले. याच कालावधीत वाशिमला सर्वात कमी म्हणजे केवळ ७४ लाख, परभणीला केवळ ७६ लाख, तर हिंगोलीला केवळ ८६ लाख रुपये मिळाले. 'सीएसआर'च्या वाट्यातूनही राज्यातील 'विकासाचा अनुशेष' असा लख्ख दिसतो. कंपन्यांनी घोषित केलेल्या जिल्ह्यांनुसार राज्यातील प्रथम आणि शेवटच्या जिल्ह्यांमधली शिक्षणातील 'सीएसआर'ची सात वर्षांची एकत्रित तफावत तब्बल १,३८,६५४ टक्क्यांची आहे. वरचे पाच (पुणे, मुंबई, रायगड, ठाणे, औरंगाबाद) आणि तळाचे पाच (वाशिम, परभणी, हिंगोली, बीड, जळगाव) जिल्हे तुलनेला घेतले तरी ही तफावत तब्बल २७,९०३ टक्के इतकी प्रचंड आहे. पुणे व मुंबईला मिळालेला एकूण निधी उर्वरित सर्व जिल्ह्यांच्या एकत्रित निधीच्या दीडपटीपेक्षा जास्त आहे. याशिवाय, उपरोक्त कलम १३५ मधील पोटकलम ५ नुसार कंपन्यांनी 'आपल्या कार्यक्षेत्राच्या आसपासच्या, स्थानिक भागाला प्राधान्य देणं' अपेक्षित आहे. 'सीएसआर'संबंधी कायदा केंद्र सरकारच्या अखत्यारीतला असल्यामुळं नवनवे आदेश काढून सीएसआरचा निधी कधीही वळवला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, २०२० च्या पूर्वार्धात 'पीएमकेअर्स'ला दिला जाणारा निधी 'सीएसआर'मध्ये ग्रा धरण्यात आल्याच्या प्रसिद्धीपत्रकानंतर ऐन करोनाच्या वर्षांत अनेक सरकारी व खासगी कंपन्यांचा 'सीएसआर' मोठ्या प्रमाणात 'पीएमकेअर्स'कडे वळाला.

## संपादकीय »

### हे अपत्य कोणाचे?

***राजकीय हेतूने प्रेरित आरक्षणाचा मुद्दा देशात कोठेही सुटलेला नाही. यावर अंतिम आणि कायमस्वरूपी तोडगा असेल तो जातनिहाय जनगणना हाच..***

आरक्षणाचा मुद्दा उकरणे हे वाघावर स्वार होण्यासारखे आहे. एकदा का वाघावर स्वार झाले की पायउतार होता येत नाही. पायउतार झाल्यास वाघ खाणार आणि न व्हावे तर किती काळ तो बसू देणार हा प्रश्न. एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस आणि कानामागून आलेले आणि तिखट होऊन बसलेले अजित पवार यांच्या सरकारला या सत्याची जाणीव एव्हाना पुरेशी झाली असावी. मनोज जरांगे यांनी जालन्यात राखीव जागांच्या मुद्द्यावर उपोषण सुरू केल्यापासून राज्य सरकारची असहायता पुन:पुन्हा समोर येत राहिली. पण कसे हे ते सांगत नाहीत. दुसरीकडे जरांगे यांच्या समर्थकांना आवरण्याच्या नादात पोलिसांनी अतिउत्साहात लाठीमार केल्याचे पाप अंगास चिकटल्यापासून गृहमंत्रीपद सांभाळणारे उपमुख्यमंत्री फडणवीस या विषयावर जरा हातचे राखून दिसतात आणि तिसरीकडे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार हात झटकत म्हणणार आपण जरांगे यांना समजावण्यात कमी पडलो!

**देशात होत असलेल्या पोटनिवडणुकीचे निकाल ही काही नेहमीच आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकांची संभाव्य झुळूक असते असे म्हणता येत नाही. कारण या अगोदर झालेल्या पोटनिवडणुका व त्या नंतरच्या विधानसभा व लोकसभा निवडणुकांचे निकाल उलट आले हे अनेकदा सिद्ध झाले आहे. असे असले तरी जनमताचा कौल हा वेगळाच असतो.**

# भाजपला धडा शिकवला की 'इंडिया'ला ?

तो कोणाला कधी सत्तेतून घालवेल याचा नेम नसतो. कारण मतदार त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या मुद्द्याबरोबरच तो धार्मिक व सामाजिक मुद्द्याचाही विचार करू लागला आहे. परंतु पोटनिवडणुकीत मिळालेल्या विजयातून सत्तेमध्ये नसलेल्या विरोधी पक्षांना हर्ष वाटणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. यातून विरोधी पक्षांमध्ये अधिक जोर लावून पुढील निवडणुका लढण्याचा हुरूप येत असतो. नुकतेच ८ सप्टेंबरला घोषित झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल संमिश्र आले असले तरी पुढील विधानसभा व लोकसभांची दिशा ठरविणारे आहेत. या निकालांतून सध्या तरी भाजपेतर विरोधी पक्षांची एकजूट झालेली दिसते, त्या दृष्टिकोनातून 'इंडिया' आघाडीच्या भविष्यासंदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे. सात विधानसभा मतदारसंघांत झालेल्या पोटनिवडदणुकामध्ये 'इंडिया'च्या घटक पक्षांना एकूण चार, तर भाजपला तीन जागांवर विजय




मिळाला. या पोटनिवडणुकामध्ये भाजपचा पराभव झाल्याचे दिसत नसून त्यांनी जागांची संख्या कायम ठेवली आहे. भाजपला पश्चिम बंगाल मधील धूपगुडी मतदार संघात तृणमूल कॉंग्रेसकडून हार पत्करावी लागली असली तरी, त्रिपुरातील बॉक्सनगर मतदार संघात भाजपने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पराभव केला. तर उत्तराखंडमधील बागेश्वर व त्रिपुरातील धानपूर मतदारसंघ कायम राखला. कॉंग्रेसने केरळातील पुथुपल्ली व झारखंड मुक्ती मोर्चाने दुमरी हे मतदारसंघ आपल्याकडे कायम राखले आहेत. त्यामुळे हे निकाल सर्वासाठी समसमान असून केवळ मताच्या टक्केवारीमध्ये कमी अधिकपणा आलेला आहे. आणि हीच टक्केवारी पुढे होणाऱ्या निवडणुकातील सूत्र ठरण्यास कारणीभूत ठरणार आहे. पण 'जागा ज्या पक्षाकडे होती त्याच पक्षाकडे कायम राहिली' हे सरळसाधे विधान, उत्तर प्रदेशातील घोसी मतदारसंघात मात्र वाटते तितके साधे राहिले नाही, ते कसे? उत्तर प्रदेशातील घोसी मतदार संघातून आलेला निकाल हा भारतीय जनता पक्षासाठी धक्कादायक तर 'इंडिया' आघाडीसाठी सुखकारक आहे. कारण घोसी मतदारसंघात समाजवादी पक्षाच्या उमेदवाराने मूळचे समाजवादी पक्षाचेच, पण भाजपमध्ये गेलेले दारासिंह चौहान यांचा ४२,७५९ इतक्या मताधिक्यांनी पराभव केला. हे दारासिंह चौहान या मतदारसंघातील मजबूत उमेदवार मानले जात. त्यांची सामाजिक व राजकीय सुरुवात ही बहुजन समाज पक्षाचे संस्थापक कांशीराम यांच्यासोबत झाली होती. बहुजन समाज पक्षाचा नेता व आमदार म्हणून ते परिचित होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सरकारला 1 महिन्याची मुदत!

## जरांगे पाटलांनी उपोषण मागे घेण्याची दाखवली तयारी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारला अद्याप मराठा आरक्षणाचा तिढा सोडवता आलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी याप्रकरणी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. परंतु, या बैठकीतून काही निष्पन्न झाल्याचं दिसत नाही. त्यामुळे राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्याकडे एक महिन्याचा अवधी मागितला होता.**



मनोज जरांगे सरकारला वेळ देण्यास तयार नव्हते. परंतु, हे प्रकरण किचकट असल्यामुळे मनोज जरांगे यांनी आता वेळ देण्यास अनुकूलता दर्शवली आहे. आपली भूमिका स्पष्ट करताना मनोज जरांगे म्हणाले, आपण (आंदोलक) या सरकारला एक महिन्याचा वेळ दिला तरी मी ही जागा सोडणार नाही. तुमच्या हातात जातप्रमाणपत्र पडत नाही तोवर मी मागे हटणार नाही. मनोज जरांगे उपोषणाला बसलेल्या आंदोलकांना म्हणाले, “मराठा समाजाने सरकारला ४० वर्ष दिली आहेत, आता एक महिना देऊ.” जरांगे पाटलांनी सर्व आंदोलकांना विचारलं की आपण या सरकारला एक महिना द्यायचा का? त्यावर सर्व आंदोलकांनी होकार दिला. मनोज जरांगे आंदोलकाना म्हणाले, मी तुमचा सर्वांचा आहे, माझ्यावर कोणीही शंका घेऊ नका. समाजावर डाग लागू नये, समाजाला कोणीही बदनाम करू नये, सरकारला आपण वेळ दिला नाही म्हणून कोणी काही बोलू नये म्हणून मी दोन पावलं मागे जातोय. केवळ जातीसाठी दोन पावलं मागे जातोय. पण, एक महिन्यात आरक्षण मिळालं नाही तर ३१ व्या दिवशी मी परत आमरण उपोषण करेन. त्यानंतर सलाईन, पाणी घेणार नाही. मी उपोषण सोडायला तयार आहे पण ही जागा सोडायला तयार नाही. पुढचे ३० दिवस इथे (अंतरवाली सराटी) आपलं आंदोलन सुरूच राहील. ३१ व्या दिवशी आरक्षण नाही दिलं तर सगळ्या मंत्र्यांना महाराष्ट्राची सीमा ओलांडू देणार नाही. मनोज जरांगे म्हणाले, मराठ्यांना जातप्रमाणपत्र मिळत नाही तोवर मी इथून हलणार नाही. महिनाभर लेकरांचं तोंड पाहणार नाही, घराचा उंबरा (उंबरठा) बघणार नाही. ज्या दिवशी जातप्रमाणपत्र हातात मिळेल त्या दिवशी आंदोलन मागे घेईन. पण ही जबाबदारी तुमच्या जीवावर पार पाडतोय. पुढचे ३० दिवस तुम्ही स्वयंसेवक बना. सर्वांना शिस्त लावा. महिनाभर गावागावांमध्ये साखळी उपोषण चालवायचं आहे. दिल्लीचे शेतकरी आठ महिने आंदोलन करत होते, हटले नाहीत पठ्ठे, मग तुम्हाला एक महिना जमणार नाही का? मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार उदयनराजे भोसले आणि माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आल्यावरच उपोषण सोडेन मनोज जरांगे यांनी यावेळी पाच मागण्या मांडल्या. ज्यामध्ये, समितीचा अहवाल कसाही आला तरी मराठ्यांना सरसकट जातप्रमाणपत्र द्यावं लागणार. आरक्षणासाठी मोर्चे आणि आंदोलन करत असताना महाराष्ट्रात जेवढे गुन्हे दाखल झाले आहेत ते सगळे गुन्हे मागे घेतले जावेत. उपोषणकर्त्या आंदोलकांवर लाठीहल्ला करणारे तसेच मराठा आंदोलकांवर कारवाई करणारे जे अधिकारी दोषी आहेत त्यांचं निलंबन करा. उपोषण सोडण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री, सगळं मंत्रिमंडळ तसेच खासदार उदयनराजे भोसले, माजी खासदार संभाजीराजे भोसले हे सगळे आले पाहिजेत. तसेच सर्व आश्वासनं लेखी आणि वेळेच्या मर्यादित हवी आहेत. मनोज जरांगे म्हणाले, आपल्या मागन्या मान्य केल्या नाहीत तर आजपासून पुढच्या महिन्यात १२ तारखेला १०० एकरात विराट सभा घेऊ. अशी सभा घेऊ की भारतात मराठ्यांचं नाव घेतलं तरी थरथराट झाला पाहिजे. ट्रॅक्टर, ट्रॉल्या भरून माणसं आणायची. मी उपोषण सोडलं तरी आंदोलन सुरू राहील. या आमरण उपोषणाचं साखळीत रुपांतर करा.

### जरांगे पाटलांनी पाच मांडल्या मागण्या

» मनोज जरांगे यांनी यावेळी पाच मागण्या मांडल्या. ज्यामध्ये, समितीचा अहवाल कसाही आला तरी मराठ्यांना सरसकट जातप्रमाणपत्र द्यावं लागणार. आरक्षणासाठी मोर्चे आणि आंदोलन करत असताना महाराष्ट्रात जेवढे गुन्हे दाखल झाले आहेत ते सगळे गुन्हे मागे घेतले जावेत. उपोषणकर्त्या आंदोलकांवर लाठीहल्ला करणारे तसेच मराठा आंदोलकांवर कारवाई करणारे जे अधिकारी दोषी आहेत त्यांचं निलंबन करा. उपोषण सोडण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री, सगळं मंत्रिमंडळ तसेच खासदार उदयनराजे भोसले, माजी खासदार संभाजीराजे भोसले हे सगळे आले पाहिजेत. तसेच सर्व आश्वासनं लेखी आणि वेळेच्या मर्यादित हवी आहेत.

# उद्धव ठाकरे म्हणायचे की उद्धव गांधी : नीतेश राणे

## उद्धव यांचे गुण अन् विचार पाहता त्यांची डीएनए चाचणी करण्याची गरज

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वर्षानुवर्षे आमच्या मनात जो संशय होता तो हळू हळू वाढत चालला आहे. किंबहुना त्यावर शिक्कामोर्तब होत आहे की, खरेच उद्धव ठाकरे बाळासाहेब ठाकरे यांचा पुत्र आहे का? की त्यांना मुंबईतील कचऱ्यातून उचलून ठाकरे आडनाव दिले आहे? त्यांचे गुण आणि विचार पाहता डीएनए तपासणीची गरज वाटत आहे.**



कुठल्याच बाजूने हा बाळासाहेब ठाकरे यांचा पुत्र वाटत नाही, अशी एकेरी भाषेत टीका भाजप आमदार नीतेश राणे यांनी केली आहे. दरम्यान नीतेश राणे पुढे बोलताना म्हणाले की, खऱ्या अर्थाने बाळासाहेब ठाकरेंचे रक्त त्याच्यात असेल, तो खरेच त्यांचा पुत्र असता तर हिंदू धर्माबद्दल होणारी भाषणे, राम मंदिराच्या निर्माणासंदर्भात होणारी वक्तव्ये आणि काँग्रेसच्या ज्या प्रकारे तो प्रेमात पडला आहे ते बघितल्यानंतर हा बाळासाहेबांचा मुलगा होऊच शकत नाही, ठाकरेंच्या घरात जन्माला येऊच शकत नाही, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आमदार नीतेश राणे म्हणाले की, राम मंदिराविषयी केलेल्या वक्तव्याबाबत NIA ने उद्धव ठाकरे यांना अटक करावी. उद्धव ठाकरे याचा इतिहास दंगली घडवण्याचा आहे. दंगली भडकवल्याशिवाय तो सत्तेत येऊ शकत नाही हे त्यांना माहित आहे.

आज राहुल गांधी युरोपमध्ये जाऊन चीनचे जे गोडवे गात आहे. हिंदूविरोधी जी भूमिका घेत आहे. ती आता उद्धव ठाकरे घ्यायला लागला आहे. याला उद्धव ठाकरे म्हणायचे की उद्धव गांधी म्हणायचे हा आता आमच्यासमोर प्रश्न आहे, असा हल्लाबोल नीतेश राणे यांनी केला आहे. नीतेश राणे म्हणाले की, 2014 ते 2019 मध्ये जेवढे रक्ताच्या भावाने सांभाळल नाही तेवढे प्रेम आणि विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना दिला. याच्यासारखा नमकहराम ज्या मातोश्री 2 मध्ये राहतोय ते मातोश्री 2 हा देवेंद्र फडणवीसांचा आशीर्वाद आहे. त्या देवेंद्र फडणवीसांवर असे बोलत असताल तर तुझे थोबाड बंद करण्याची हिंमत आमच्याकडे आहे. पोलिसांना मी सांगेन की महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवायची असेल तर यांचे थोबाड बंद ठेवा. नाहीतर आमचे कार्यकर्ते कोणत्या तरी सभेमध्ये स्टेजवर जातील आणि लाथांनी आणि चपलेने तुडवून तोंडावर काळी शाई फासतील, मग त्यांच्यावर केसेस करायच्या नाहीत. ही धमकी समजा किंवा आवाहन.

### सडलेली वांगी की वाकलेली काकडी?

» नीतेश राणे पुढे बोलताना म्हणाले की, दुसऱ्यांच्या शरीराबद्दल हा व्यक्ती बोलतो. हातवारे करून दुसऱ्यांच्या शरीराचे विश्लेषण करतो पण त्याला स्वतःच्या शरीराचा थांगपत्ता नाही. पुरुष आहे की स्त्री हे तपासण्याची आता वेळ आली आहे. उभे राहायला यांना दोन माणसे लागतात आणि अशा व्यक्तीने दुसऱ्यांच्या शरीरावर बोलणे याला सडलेली वांगी बोलायचे की वाकलेली काकडी बोलायचे? असा जहरी सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

# आता मथुरेचा कायापालट होणार!

## » याच वर्षीपासूनच मथुरा कॉरिडॉरचे बांधकाम सुरू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काशी आणि अयोध्यानंतर आता मथुरेत 505 कोटी रुपये खर्चून भव्य कॉरिडॉर बनवण्याची तयारी सुरू झाली आहे. ब्रज तीर्थ विकास परिषदेने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासमोर कृती आराखड्याची विस्तृत रूपरेषा सादर केली. यामध्ये काही सुधारणा करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. सुधारणांनंतर ही योजना लवकरच अलाहाबाद उच्च न्यायालयासमोर मांडण्यात येणार आहे.**

कोर्टाची मंजुरी मिळाल्यानंतर या वर्षी कॉरिडॉरचे काम सुरू करण्याचा योगी सरकारचा प्रयत्न आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी 18 सप्टेंबर रोजी होणार आहे. उल्लेखनीय आहे की, गेल्या वर्षी जन्माष्टमीच्या दिवशी दोन भाविकांचा गर्दीत चिरडून मृत्यू झाला होता. यानंतर एका याचिकेवर सुनावणी करताना हायकोर्टाने राज्य सरकारला कॉरिडॉर बांधण्याची योजना सादर करण्यास सांगितले होते. यानंतर एका याचिकेवर सुनावणी करताना हायकोर्टाने राज्य सरकारला कॉरिडॉर बांधण्याची योजना सादर करण्यास सांगितले होते. 22,800 स्क्वेअर मीटरमध्ये प्रस्तावित असलेल्या या कॉरिडॉरच्या माध्यमातून बांके बिहारीला भेट देण्यासाठी कमी वेळ लागणार आहे. गर्दी व्यवस्थापनात सोय होईल.

सध्या एकावेळी केवळ 800 भाविकांनाच दर्शन घेता येते. कॉरिडॉर तयार झाल्यानंतर ही क्षमता वाढून 5 हजार होणार आहे. वाराणसीनंतर 2022-23 मध्ये सर्वाधिक 6.52 कोटी धार्मिक पर्यटक राज्यात मथुरेत आले. सामान्य दिवशी तासाला 2600 तर एका दिवसात 15 हजार भाविक येतात. त्याचबरोबर दररोज 50 हजार भाविक उत्सवासाठी पोहोचतात. अरुंद रस्ते, निवास व स्वच्छतागृहांची सोय नसल्यामुळे भाविकांना अडचणींचा सामना करावा लागतो. भगवान बांकेबिहारींचे सध्याचे मंदिर संवत 1826 मध्ये स्थापन झाले. त्यावेळी मंदिर खूपच लहान होते. हळूहळू भव्य मंदिराची गरज भासू लागली, त्यासाठी मंदिराच्या गोस्वामींनी निधी गोळा करण्यास सुरुवात केली. सध्याचे मंदिर संवत 1921 मध्ये म्हणजेच 1868 मध्ये पूर्ण झाले. त्यावेळी त्याच्या बांधकामाला 70 हजार रुपये खर्च आला होता. बांके बिहारी मंदिर सुमारे 1500 यार्डमध्ये बांधले आहे. 4 भागांनी बनलेल्या या मंदिरात गर्भगृह, जगमोहन, अंगण आणि भांडार आहे. जगमोहन व अंगणात उभे राहून भक्तांनी भगवंताचे दर्शन घेतले. अंगण सुमारे 2300 फूट असून मागील भाग 600 फूट बांधला आहे. याशिवाय सुमारे 400 यार्डांमध्ये अर्ध-निर्मित हॉल आहे. अयोध्येत उभारल्या जाणाऱ्या राम मंदिराच्या गर्भगृहात बसवल्या जाणाऱ्या रामाच्या मूर्तीच्या उभारणीचे काम सुरू झाले आहे. जानेवारी 2024 मध्ये मकर संक्रांतीच्या दिवशी गर्भगृहात या मूर्तीची स्थापना केली जाईल. 35 फूट अंतरावरून भाविकांना मूर्तीचे दर्शन घेता येणार आहे. रामनवमीच्या दिवशी गर्भगृहातील रामललाच्या कपाळाला सूर्याची किरणे स्पर्श करतील. यासाठी खगोलशास्त्र आणि भौतिकशास्त्रातील तज्ज्ञांची टीम तयार करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 ऑक्टोबर 2022 रोजी श्री महाकालेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराचे नवीन दर्शन संकुल 'महाकाल लोक' भक्तांना समर्पित केले होते. अहमदाबादहून विशेष विमानाने पंतप्रधान इंदूरला पोहोचले होते. येथून ते हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने उज्जैनला आले, तेथे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी त्यांचे स्वागत केले. पंतप्रधानांनी येथून थेट महाकाल मंदिर गाठले. येथे गर्भगृहात त्यांनी नंदीला नमस्कार केला आणि महाकालाचे दर्शन घेतले. बाबांचा आशीर्वाद घेऊन महाकाल लोक सुरू केले.



### एका दिवसात 15 हजार भाविक

» यानंतर एका याचिकेवर सुनावणी करताना हायकोर्टाने राज्य सरकारला कॉरिडॉर बांधण्याची योजना सादर करण्यास सांगितले होते. 22,800 स्क्वेअर मीटरमध्ये प्रस्तावित असलेल्या या कॉरिडॉरच्या माध्यमातून बांके बिहारीला भेट देण्यासाठी कमी वेळ लागणार आहे. गर्दी व्यवस्थापनात सोय होईल. सध्या एकावेळी केवळ 800 भाविकांनाच दर्शन घेता येते. कॉरिडॉर तयार झाल्यानंतर ही क्षमता वाढून 5 हजार होणार आहे. वाराणसीनंतर 2022-23 मध्ये सर्वाधिक 6.52 कोटी धार्मिक पर्यटक राज्यात मथुरेत आले. सामान्य दिवशी तासाला 2600 तर एका दिवसात 15 हजार भाविक येतात. त्याचबरोबर दररोज 50 हजार भाविक उत्सवासाठी पोहोचतात.

# लँड फॉर जॉबप्रकरणी लालूंवर गुन्हा दाखल होणार!


## » तेजस्वींच्या आरोपपत्रावर आता 21 सप्टेंबरला होणार सुनावणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नोकरीसाठी जमीनप्रकरणी माजी रेल्वेमंत्री लालू यादव यांच्यावर गुन्हा दाखल होणार आहे. यासाठी केंद्र सरकारकडून सीबीआयला परवानगी मिळाली आहे. महिनाभरापूर्वी सीबीआयने लालूंवर खटला चालवण्यासाठी केंद्राकडे परवानगी मागितली होती.**

माजी केंद्रीय रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव यांच्या विरोधात कथित जॉब फॉर जॉब प्रकरणी नव्या आरोपपत्राबाबत गृह मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्याचे सीबीआयने आज दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टात सांगितले. सीबीआयने सांगितले की, लालूंव्यतिरिक्त आम्ही तीन रेल्वे अधिकाऱ्यांवर खटला चालवण्याची परवानगी मागितली होती. जे सध्या तरी सापडलेले नाहीत. आठवडाभरात परवानगी मिळण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्याविरुद्ध सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रावर दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टात आज होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. पुढील सुनावणीची तारीख 21 सप्टेंबर निश्चित करण्यात आली आहे. जर स्त्रोतांवर विश्वास ठेवायचा असेल तर, जॉब्सच्या बदल्यात जमीन हे एक नवीन प्रकरण आहे. आरजेडी सुप्रीमो लालू यादव, बिहारच्या माजी मुख्यमंत्री राबडी देवी आणि कन्या आणि खासदार मीसा भारती हे जुन्या प्रकरणात आधीच जामिनावर आहेत. नव्या प्रकरणात लालू आणि राबडी देवी यांनाही आरोपी करण्यात आले आहे. सीबीआयने 3 जुलै रोजी तेजस्वींविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. आरोपपत्र मान्य आहे की नाही, याचा निर्णय पुढील सुनावणीत घेतला जाईल. न्यायालयाने तेजस्वींविरोधातील आरोपपत्र स्वीकारल्यास त्यांना या प्रकरणात जामीन मिळावा लागेल. लँड फॉर जॉब्स प्रकरणात 11 एप्रिल रोजी सीबीआयने तेजस्वी यादव यांची दिल्लीत 8 तास चौकशी केली होती. सीबीआयने तेजस्वीला दोन शिफ्टमध्ये सुमारे आठ तास वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे मागितली होती. सीबीआयचे समन्स रद्द करण्यासाठी तेजस्वीने दिल्ली उच्च न्यायालयातही धाव घेतली होती. सीबीआयचे समन्स रद्द करण्याची उपमुख्यमंत्र्यांची याचिका न्यायालयाने फेटाळली होती. त्यानंतर सीबीआयने कोर्टाला सांगितले की, सध्या तेजस्वी यादवला अटक करायची नाही. यावेळी सीबीआयनेही तेजस्वी यादव यांना काही कागदपत्रे दाखवून याची पुष्टी केली होती. त्यानंतर चौकशी केल्यानंतर तेजस्वी म्हणाली होती की, जेव्हाही चौकशी झाली तेव्हा आम्ही सहकार्य केले आणि जे काही प्रश्न विचारले गेले त्याची उत्तरे दिली. गेल्या वर्षी मे महिन्यात सीबीआयने लालूंच्या पत्नी राबडी देवी, दोन मुली मीसा भारती आणि हेमा यादव यांच्यासह त्यांच्या निकटवर्तीयांच्या 17 ठिकाणांवर छापे टाकले होते.



### घोटाळ्याची जमीन 600 कोटी रुपयांची

» लँड फॉर जॉब्स प्रकरणात, अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) म्हटले होते की हा 600 कोटींचा घोटाळा आहे. 350 कोटींचे भूखंड आणि 250 कोटींचे व्यवहार झाल्याचे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी 24 ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. यामध्ये एक कोटींची रोकड सापडली आहे. रेल्वेच्या विविध झोनमधील ग्रुप डी भरतीमध्ये 50% उमेदवारांना लालू कुटुंबीयांच्या मतदारसंघातून नियुक्त करण्यात आले आहे.

# मुलाच्या लग्नात सनी देओलने नातेवाइकांना फटकारले!

सनी देओलचा 'गदर-2' हा चित्रपट 11 ऑगस्ट रोजी रिलीज झाला होता. याच्या दोन महिन्यांपूर्वी 18 जून रोजी सनीने त्याचा मुलगा करण देओलचे लग्न लावले होते. सनी आणि त्याचे संपूर्ण कुटुंबीय त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत गोपनीयता बाळगतात. कदाचित याच कारणामुळे करणच्या लग्नाचे काही खासगी व्हिडिओ ऑनलाईन लीक झाल्याने सनी संतापला होता. अनेक प्रसंगी सोशल मीडियावर टीका करणाऱ्या सनीने नुकतेच आप की अदालतमध्ये मुलाच्या लग्नावर भाष्य केले. त्याने सांगितले की, त्याच्या काही नातेवाईकांनी लग्नाचे व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर अपलोड केल्यावर तो खूप अस्वस्थ झाला होता. 'लग्नाचे वातावरण असल्याने अनेक नातेवाईक आमच्या



घरी थांबले होते. मी पाहिले की त्यांच्यापैकी बरेच जण लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत आहेत. मी अनेकांना खडसावले. त्यांना विचारले की हे करताना लाज वाटते की नाही? मी अस्वस्थ होतो पण मी जास्त काही करू शकलो नाही. काही वेळाने मी पाहिले की प्रत्येकजण आपापल्या फोनवरून व्हिडिओ रेकॉर्ड करत आहे. मी सगळ्यांना रोखू शकलो नाही. 'सोशल मीडिया आल्यापासून सर्व बेरोजगारांना एक साधन मिळाले आहे. आता जे मनात येईल ते सांगतात आणि करतात. त्यामुळे कुणाला त्रास होईल की नाही याचीही त्यांना पर्वा नसते.

# आलिया भट्ट रोज बिग बॉस पाहायची

पूजा भट्ट अलीकडेच बिग बॉस ओटीटी या रिॲलिटी शोच्या दुसऱ्या सीझनमध्ये दिसली होती. तिने टॉप फायनलमध्येही आपले स्थान निर्माण केले. शोमधून बाहेर पडल्यानंतर पूजाने तिच्या आयुष्याशी आणि कुटुंबाशी संबंधित अनेक रंजक किस्से शेअर केले आहेत. अभिनेत्रीने अलीकडेच तिची सावत्र बहीण आलिया भट्टसोबतच्या नात्याबद्दल सांगितले. पूजाने सांगितले की, बिग बॉसमध्ये आल्यानंतर तिची आणि आलियाची जवळीक वाढली आहे. ती आलियाची मुलगी राहा आणि पती रणबीर कपूरबद्दलही बोलली. सिद्धार्थ कानननला दिलेल्या मुलाखतीत पूजा म्हणाली- ज्या दिवशी मी बिग बॉसच्या घरातून बाहेर पडले, आलियाने मला कॉल केला. ती मला म्हणाला- 'पूजा, बिग बॉसमध्ये मला तू सर्वात जवळची वाटली, कारण असा एकही दिवस गेला नाही की जेव्हा मी शो पाहिला नाही. ती 24 तास हा शो पाहायची. पूजाने सांगितले की, जेव्हा तिला शोमध्ये चिखलाशी संबंधित काम मिळाले तेव्हा आलियाही नाराज झाली. त्या दिवसांत ती लॉस एंजेलिसमध्ये होती. तिने वडील महेश भट्ट यांना फोन करून या कामाबद्दल सांगितले.पूजा म्हणाली- 'बिग बॉसने आम्हाला जवळ आणले आहे. मला वाटते की माझे तिच्यावर खूप प्रेम आहे. ती एक अद्भुत आईदेखील आहे. आलिया भट्टची मुलगी राहा कपूरबद्दल बोलताना पूजा म्हणाली- 'राहा खूप सुंदर आहे. भट्ट कुटुंबाला दर 20 वर्षांनी एक स्टार मिळतो. पहिली स्टार पूजा होती, त्यानंतर 20 वर्षांनी आलिया भट्ट आणि आता राहाची पाळी आहे.



# अफेअरच्या अफवांवर कुशाची प्रतिक्रिया

अभिनेत्री आणि कंटेंट क्रिएटर कुशा कपिला लवकरच शिल्पा शेट्टी स्टारर 'सुखी' आणि भूमी पेडणेकर स्टारर 'थँक यू फॉर कमिंग'मध्ये दिसणार आहे. घटस्फोटानंतर कुशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अलीकडेच कुशाचे नाव अभिनेता अर्जुन कपूरसोबत जोडले गेले. आता कुशाने नुकतेच सांगितले आहे की ती ट्रोलिंगदरम्यान लोकांच्या या विचारसरणीला कशी सामोरे जात आहे. 'जर तुम्हाला असे वाटत असेल की लोकांनी तुमच्याबद्दल नेहमीच चांगले बोलले पाहिजे, तर याचा अर्थ तुम्ही लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवू इच्छित आहात. लोक तुमच्याबद्दल काय बोलतात याची तुम्हाला नेहमी काळजी असते. अभिनेत्री म्हणाली की लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती सार्वजनिक व्यक्ती असते. लोक तिच्याबद्दल काय विचार करतात आणि तिच्याकडून काय अपेक्षा करतात याबद्दल कुशा बोलली. ती याचा विचार करत नाही. ती म्हणाली- 'मला ती व्यक्ती व्हायचे नाही, जिला वयाच्या 50 व्या वर्षी असे वाटते की तिने आपले आयुष्य जगले नाही. तिला जे करायचे होते ते केले नाही. सर्वस्व दिले पण स्वतःचा विचार केला नाही. मला असं आयुष्य जगायचं नाही. काही दिवसांपूर्वी कुशाने अर्जुन कपूरसोबतच्या रिलेशनशिपच्या अफवांवर प्रतिक्रिया दिली होती. ती म्हणाली, 'मी दररोज माझ्याबद्दल इतके बाष्कळ वाचते की आता मला माझा औपचारिक परिचय देताना त्याबद्दल बोलायचे आहे. प्रत्येक वेळी जेव्हा मी माझ्याबद्दल काहीतरी वाचते तेव्हा मी आशा करते आणि प्रार्थना करते की माझ्या आईने हे सर्व वाचू नये. तिचे सामाजिक जीवन तसेही बिघडत चालले आहे.



# तैमूरने सामान्य जीवन जगावे : करीना कपूर

करीना कपूर आणि सैफ अली खान यांचा मोठा मुलगा तैमूर अली खान नेहमीच पापाराझींचा आवडता राहिला आहे. तो सर्वात जास्त कॅप्चर केला जाणारा स्टार किड देखील ठरला आहे. त्याच्यावर डॉलही बनवण्यात आल्या आहेत. आता एका मुलाखतीत करीना कपूरने बॉलिवूडच्या प्रसिद्ध पापाराझी ट्रेंडबद्दल सांगितले. पालक या नात्याने त्यांनी आपल्या मुलांचे चेहरे फोटोग्राफर्सपासून का लपवले नाहीत हेही त्यांनी सांगितले. एक्सप्रेस अड्डाला दिलेल्या मुलाखतीत करीना म्हणाली, 'ही प्रक्रिया खूपच कठीण होती. आम्ही आमच्या मुलांचे चेहरे छायाचित्रकारांपासून कधीही लपवले नाही कारण त्यामुळे त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. मी सैफशी याबद्दल चर्चा केली होती आणि त्यानेही सुचवले होते की आपण याला एकत्रितपणे सामोरे जावे. करीना म्हणाली, 'आम्हाला नेहमी वाटायचे की, याला असेच सोडणे चांगले. त्यांना लपविल्याने त्यांच्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. असे केल्याने तो लाजाळू झाला असता की त्याच्यावर आणखी काही परिणाम झाला असता कुणास ठाऊक. मी लहान असताना, मला कुठेही बाहेर जायला आवडत नसे कारण माझ्या पालकांनी मला लपवून ठेवले होते. तैमूरने सामान्य जीवन जगावे अशी माझी इच्छा होती. यावेळी करीनाने सांगितले की, तैमूरला वयाच्या 4 व्या वर्षापासून त्याचे फोटो काढले जात असल्याचे लक्षात येऊ लागले होते. अभिनेत्री म्हणाली, 'तो खूप हुशार आहे कारण त्याला माहित आहे की आम्ही कलाकार आहोत. जेव्हा मी त्याला सांगितले की आम्ही चित्रपटांमध्ये दिसतो, तेव्हा तो माझ्याकडे वळला आणि मला विचारले की मी फेमस नाही, मग ते माझे फोटो का काढतात? मात्र, आता तैमूरला याची सवय झाली आहे.

# भारताचा पाकवर सर्वात मोठा विजय!

## » कारकिर्दीतील हे 24 वे ग्रँडस्लॅम, मेदवेदेवचा केला पराभव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषकाच्या सुपरफोर मध्ये भारताने पाकिस्तानचा २२८ धावांनी पराभव केला. पावसाने व्यत्यय आणलेला सामना दोन दिवसांत संपला. रविवारी (१०सप्टेंबर) सामना सुरू झाला, मात्र पावसामुळे तो पूर्ण होऊ शकला नाही. खेळ थांबला तोपर्यंत भारताने २४.१ षटकात १४७ धावा केल्या होत्या.**

सोमवार हा सामन्याचा राखीव दिवस होता. पुढे खेळताना भारतीय संघाने ५० षटकांत ३५६ धावा केल्या. कोहली एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान ४७ शतके करणारा फलंदाज ठरला. त्याने सचिनचा विक्रमही मोडला. सचिनने आपल्या ४३५ व्या डावात ४७ वे एकदिवसीय शतक पूर्ण केले होते, तर कोहलीने २६७ व्या डावात हा पराक्रम केला. प्रत्युत्तरात पाकिस्तान संघाला ३२षटकांत आठ गडी गमावून केवळ १२८ धावा करता आल्या. नसीम शाह आणि हरिस रौफ दुखापतीमुळे फलंदाजी करू शकले नाहीत. अशा प्रकारे टीम इंडियाने २२८ धावांनी विजय मिळवला.भारतीय संघाने पाकिस्तानवर २२८ धावांनी मोठा विजय मिळवला आहे. एकदिवसीय इतिहासातील धावांच्या बाबतीत भारताचा पाकिस्तानवरचा हा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी टीम इंडियाने २००८ च्या आशिया कपमध्ये बांगलादेशच्या मीरपूरमध्ये १४० धावांनी त्यांचा पराभव केला होता. भारताने प्रथम फलंदाजी करताना विराट कोहली आणि लोकेश राहुलच्या शतकी खेळीमुळे दोन गडी गमावून ३५६ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ आठ विकेट्सवर केवळ १२८ धावा करू शकला आणि सामना २२८ धावांनी गमावला. पाकिस्तान संघाला ३२ षटकात केवळ १२८ धावा करता आल्या. दुखापतग्रस्त हरिस रौफ आणि नसीम शाह फलंदाजीला आले नाहीत. पाकिस्तानचे फलंदाज कुलदीप यादवचे चेंडू समजू शकले नाहीत. कुलदीपने अप्रतिम गोलंदाजी करत आठ षटकांत २५ धावा देत पाच बळी घेतले. त्याच्याशिवाय जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या आणि शार्दुल ठाकूर यांना प्रत्येकी एक विकेट घेतली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानचे फलंदाज पूर्णपणे अपयशी ठरले. संघाचे केवळ चार फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. फखर जमानने सर्वाधिक २७ धावा केल्या. इफ्तिखार अहमद आणि आगा सलमानने २३-२३ धावा केल्या. कर्णधार बाबर आझम १० धावा करून बाद झाला. या चौघांशिवाय एकाही फलंदाजाला १० धावांपर्यंत मजल मारता आली नाही. इमाम उल हक केवळ नऊ, शादाब खान सहा, फहीम अश्रफ चार आणि मोहम्मद रिझवान केवळ दोन धावा करू शकले. शाहीन आफ्रिदी सात धावा करून नाबाद राहिला.




### विराटने मोडला सचिनचा विक्रम

» या सामन्यात विराट कोहलीने ९४ चेंडूत ३ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने नाबाद १२२ धावांची खेळी केली. सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद ७७ शतके झळकावण्यात यश मिळवले आणि सचिन तेंडुलकरला मागे टाकले. सचिनने ५९४ डावात ७७ शतके पूर्ण केली होती, तर कोहलीने ५६१ डावात हा पराक्रम केला आहे. कोहली एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान ४७ शतके करणारा फलंदाज ठरला. त्याने सचिनचा विक्रमही मोडला. सचिनने आपल्या ४३५ व्या डावात ४७ वे एकदिवसीय शतक पूर्ण केले होते, तर कोहलीने २६७ व्या डावात हा पराक्रम केला.

# मला वाटलं 'सचिन तेंडुलकर' मेला!

## » तेंडुलकर, धोनी विरुद्ध रचला डाव : शोएब अख्तर

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषकाच्या सुपर चार टप्यातील भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्यात बाबर आझमच्या संघाचा दारुण पराभव झाला. पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शोएब अख्तरने या पराभवानंतर भारताचे कौतुक करत व्हिडीओ पोस्ट केला. विराट कोहली, कुलदीप यादव, के. एल राहुल, बुमराह यांचं कौतुक करताना अख्तरने "पाकिस्तानला एका मॅचने खेळातून बाहेर टाकता येणार नाही, पाकिस्तान सुद्धा नक्कीच पुनरागमन करेल" अशा विश्वास व्यक्त केला होता.**

एकीकडे शोएब अख्तरचा हा व्हिडीओ सुद्धा चर्चेत असताना एका जुन्या मुलाखतीचा व्हिडीओ सुद्धा अनेकांच्या भुवया उंचावत आहे. क्रिकेट हा जेंटलमॅन गेम म्हणून ओळखला जात असताना अख्तरने या व्हिडिओमध्ये स्वतःच्या चुकीबद्दल अभिमानाने सांगणं अनेकांना पटलेलं नाही. नेमकं हे प्रकरण काय, जाणून घेऊया.. रविवारी (10 सप्टेंबर), शोएब अख्तरचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला ज्यामध्ये तो माजी भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरला जीवघेणी दुखापत करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याची कबुली देत होता. विशेष म्हणजे हे सांगताना अख्तरचा सूर स्वतःचं कौतुक करत असल्याचा भासत होता. अख्तर म्हणाला की, "मी आज हे स्पष्टपणे सांगत आहे की, एका सामन्यात मला खरोखरच सचिनला दुखापत करायची होती, मी तोच प्रयत्न करत होतो, कोणत्याही किंमतीत त्याला दुखावण्याचा माझा निश्चय होत. इंझमाम-उल-हकने तेव्हा विकेट्ससमोर गोलंदाजी करण्यास सांगितले तरीही मी माझा प्रयत्न चालूच ठेवला. मी जाणूनबुजून त्याच्या हेल्मेटवर चेंडू मारले. जेव्हा त्याला लागलं तेव्हा तर तो (सचिन) मेलाच असेल असं मला वाटलं पण, मी रिप्ले पाहिला आणि कळलं की चेंडू त्याच्या कपाळावर आदळला...मग मी त्याला दुखापत करण्याचा पुन्हा प्रयत्न केला. या प्रकारात गोविन्दाजाने चेंडू उंच फेकल्यामुळे चेंडू उसळत नाही चेंडूमुळे फलंदाजाच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत होण्याची शक्यता असते. पण संभाव्य परिणामांची पूर्ण जाणीव असूनही अख्तरने हे जाणूनबुजून केले. अशावेळी आधी नो बॉल दिला जातो आणि गोलंदाजाला सूचित केले जाते. सामन्यादरम्यान गुन्ह्याची पुनरावृत्ती केल्यास त्याला उर्वरित सामन्यात गोलंदाजी करण्यापासून रोखले जाऊ शकते. शोएब अख्तर २००६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात नॅशनल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्याबद्दल बोलत होता. जून २०२२ मध्ये स्पोर्ट्सकीडाला दिलेल्या मुलाखतीदरम्यान हे वादग्रस्त दावे केले होते. आणि आता कालच्या भारत विरुद्ध पाकिस्तान आशिया कप सामन्याच्या नंतर मुलाखतीची एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. दरम्यान, पाकिस्तानच्या माजी वेगवान गोलंदाजाने सामन्यादरम्यान भारतीय खेळाडूंना जाणूनबुजून दुखावल्याची कबुली देण्याची ही पहिलीच वेळ नाही. ऑक्टोबर २०२१ मध्ये स्पोर्ट्स टॉकशी बोलताना, शोएब अख्तरने कबूल केले की २००६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फैजलाबाद कसोटी सामन्यादरम्यान त्याने महेंद्रसिंग धोनीला जाणूनबुजून 'बीमर' टाकला होता. पाकिस्तानी वेगवान गोलंदाज म्हणाला, "फैसलाबादमध्ये धोनीबाबत मी हीच चूक केली होती. मी जाणूनबुजून त्याच्यावर बीमर फेकला होता. धोनी एक चांगला माणूस आहे आणि मी त्याचा आदर करतो. मला त्याचं खूप वाईट वाटलं . जर चेंडू धोनीला लागला असता तर २००५ मध्येच त्याला गंभीर दुखापत झाली असती.




### बीमर गोलंदाजी म्हणजे काय?

» क्रिकेट सामन्यादरम्यान बीमर गोलंदाजी करणे बेकायदेशीर आहे. या प्रकारात गोविन्दाजाने चेंडू उंच फेकल्यामुळे चेंडू उसळत नाही चेंडूमुळे फलंदाजाच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत होण्याची शक्यता असते. असे बीमर चुकून टाकले जातात. पण संभाव्य परिणामांची पूर्ण जाणीव असूनही अख्तरने हे जाणूनबुजून केले. अशावेळी आधी नो बॉल दिला जातो आणि गोलंदाजाला सूचित केले जाते. सामन्यादरम्यान गुन्ह्याची पुनरावृत्ती केल्यास त्याला उर्वरित सामन्यात गोलंदाजी करण्यापासून रोखले जाऊ शकते.